दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. १५ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ८५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## धार येथील भोजशाळा वाग्देवी मंदिरच, नमाजस्थळाची व्यवस्था करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली :** मध्यप्रदेशच्या धार येथील ऐतिहासिक भोजशाळेला वाग्देवी (सरस्वती) मंदिर घोषित करणाऱ्या मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार दिला आहे. मात्र, प्रत्येक शुक्रवारी दुपारी 1 ते 3 या वेळेत मुस्लिम समाजाला नमाज अदा करण्यासाठी भोजशाळा परिसरालगत पर्यायी मोकळी जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

## आंध्र प्रदेशमध्ये कोरोना विषाणूचा नवा अवतार, दोघांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशमध्ये कोरोनाची लागण झाल्याने दोन रूग्णांचा मृत्यू झाला आहे. २०२२ नंतर पहिल्यांदाच आंध्र प्रदेशात कोरोनाने मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे. इतर आठ जणांना कोरोनाची लागण झाली असून त्यांना उपचारांसाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. कोरोनाची ही प्रकरणे तुरळक स्वरूपातील असून कोरोनाचा उद्रेक झाल्याचे समजू नये, असे आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. तिरूपती येथील श्री व्यंकटेश्वरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्समध्ये एका ६० वर्षीय व्यक्तीला उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते.

# ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई: 21 गोवंश जनावरांची सुटका, 24.45 लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, अवैध कत्तल आणि प्राण्यांवरील क्रूरतेविरुद्ध छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारत धडक कारवाई सुरू केली आहे. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना अवैध धंद्यांवर व तस्करीवर कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. या मोहिमेचा भाग म्हणून चिकलठाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३ जुलै रोजी रात्री पोलिसांनी एका आयशर कंटेनरवर छापा टाकून बेकायदेशीर कत्तलीच्या उद्देशाने नेली जाणारी २१ गोवंश जनावरे जप्त केली. या कारवाईत वाहनासह एकूण २४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, १३ जुलै रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास डायल-११२ वर पोलिसांना एक गुप्त माहिती मिळाली. छत्रपती संभाजीनगरहून पाचोडच्या दिशेने जाणाऱ्या एका आयशर कंटेनरमधून (क्रमांक MH-20-EG-3797) गोवंश जातीच्या जनावरांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची ती माहिती होती. माहिती मिळताच चिकलठाणा पोलिसांनी तातडीने हालचाली करत चित्तेपिंपळगाव शिवारातील हॉटेल अजिंक्य पॅलेस परिसरात नाकाबंदी केली. काही वेळातच संशयित कंटेनर तेथे पोहोचला. पोलिसांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला असता, चालकाने पोलिसांना पाहून वाहनाचा वेग कमी केला आणि अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून पळ काढला. यानंतर पोलिसांनी सदर कंटेनर ताब्यात घेऊन त्याची कसून तपासणी केली. कंटेनर उघडला असता, त्यात अत्यंत क्रूरतेने, चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता आणि आखूड दोऱ्यांनी बांधलेल्या अवस्थेत २१ गोवंश जातीचे बैल आढळून आले. प्राथमिक तपासात ही जनावरे बेकायदेशीर कत्तलीच्या उद्देशाने नेली जात असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी तात्काळ सर्व २१ बैलांची सुटका करून त्यांना चिकलठाणा येथील जैन गोशाळेत सुरक्षितपणे हलवले. या कारवाईत ६ लाख ४५ हजार रुपये किमतीची २१ जनावरे

-> पान 2 वर

## थोडक्यात वार्ता

### हर्षवर्धन जाधव पुन्हा भाजपच्या वाटेवर असल्याच्या चर्चांना उधाण




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील एका बॅनरने मंगळवारी राजकीय वर्तुळात चर्चेचे वादळ निर्माण केले. माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांच्या नावाने झळकलेल्या या बॅनरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात आली असून, राज्य सरकारच्या निर्णयांबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानण्यात आले आहेत. त्यामुळे हा केवळ अभिनंदनाचा बॅनर की भाजपशी वाढत्या जवळीकीचा राजकीय संदेश, यावर चर्चा रंगली आहे. गेल्या काही काळापासून जाधव यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत विविध अंदाज व्यक्त होत असतानाच या बॅनरने त्या चर्चांना अधिक बळ दिले आहे. शहरातील राजकीय कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये "जाधव पुन्हा भाजपमध्ये जाणार का?" हा प्रश्न चर्चेचा विषय ठरला आहे.

### सावळघाटात भीषण अपघात; महिलेसह चार जणांचा मृत्यू

**नाशिक :** नाशिक–पेठ मार्गावरील सावळघाटात मंगळवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात महिलेसह चार जणांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. भरधाव ट्रक आणि मारुती इको कार यांच्यात झालेल्या या अपघातात कारचा अक्षरशः चुराडा झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी सुमारे पाच वाजता मारुती इको कार (जीजे-१५-सीआर-५६५९) नाशिकहून पेठकडे जात होती. सावळघाटातील तीव्र उतारावर असताना पाठीमागून येणाऱ्या ट्रकचे (एमएच-०४-जीएफ-८९०१) ब्रेक अचानक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेला ट्रक वेगाने इको कारवर आदळला. या धडकेमुळे इको कार समोरील अवजड ट्रकला (एनएल-०१-एसी-१९२९) जाऊन धडकली. दोन ट्रकांच्या मध्ये कार अडकल्याने तिचा अक्षरशः चक्काचूर झाला. या भीषण अपघातात कारमधील एक महिला आणि दोन पुरुषांचा जागीच मृत्यू झाला.

### मुंबईवरुन अबू धाबीसाठी आठवड्यातून तीन दिवस विमान सेवा

**नवी मुंबई :** अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड संचलित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून नियोजित आंतरराष्ट्रीय विमानसेवेला प्रारंभ झाला असून, एअर इंडिया एक्सप्रेस १५ जुलैपासून नवी मुंबई–अबू धाबी मार्गावर आठवड्यातून तीन दिवस थेट उड्डाण सेवा सुरू करणार आहे. २५ डिसेंबर २०२५ रोजी देशांतर्गत सेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या २०० दिवसांतच विमानतळाने आंतरराष्ट्रीय सेवेचा टप्पा गाठला आहे. या सेवेमुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना संयुक्त अरब अमिरातीच्या राजधानी अबू धाबीसाठी थेट आणि अधिक सोयीस्कर हवाई संपर्क उपलब्ध होणार आहे. तसेच, अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जच्या अखत्यारीतील सर्व विमानतळ आता आंतरराष्ट्रीय सेवांशी जोडले गेले आहेत. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले की, "नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवासातील हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध यंत्रणा, नियामक संस्था तसेच सर्व भागधारकांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले.




# शेतकरी कर्जमाफीबद्दल सरकारचा मोठा निर्णय, कॅबिनेट बैठकीत 8 महत्त्वाचे निर्णय

**मुंबई :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६च्या निकषात सुधारणा करण्याचा निर्णय कॅबिनेट बैठकीत घेऊन शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. २०२९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करण्यात आली आहे.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी आज संपन्न झाली. या बैठकीत सहा महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्य मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

**८ महत्त्वाचे निर्णय :** दापचरी येथे उभारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार. दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन देण्याचा निर्णय. पालघर जिल्ह्यातील मौजे दापचरी ( ता.डहाणू) येथील दुग्ध प्रकल्पाची जमीन महाराष्ट्र राज्य कृषि पणन महामंडळास देण्यास मंजुरी. याठिकाणी आंतराष्ट्रीय दर्जाच्या कृषि बाजार उभारणीसह पणन विषयक सुविधा निर्माण करण्यात येणार. पालघर, ठाणेसह परिसरातील शेतकऱ्यांना सुविधेचा मोठा लाभ होणार. (सहकार व पणन)

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठा दिलासा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६च्या निकषात सुधारणा. २०२९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून, नियमित कर्जमाफी. सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही मिळणार प्रोत्साहनपर लाभ. (सहकार व पणन विभाग)

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तांसाठी मुद्रीकरण धोरण मंजुर. यामुळे मालमत्तांच्या वापरातून पारदर्शक आणि आणखी चांगले उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करता येणार. अल्पकालीन व दीर्घकालीन अशा नियोजनातून महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींना मिळकतीचे उपाय शोधता येणार. (नगर विकास विभाग)

राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अर्बन चॅलेंज फंड अभियान राबविण्यात येणार. शहरांना दर्जेदार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी बाजाराधारित वित्तपुरवठा मिळविता येणार. (नगर विकास विभाग)

बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या २४ कोटी ९५ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी. क्रीडा संकुलात सिंथेटीक ॲथलेटीक ट्रॅक, फुटबॉल, हॉकी मैदान, व्हॉलीबॉल, कब्बडी, खोखो मैदान, इनडोअर हॉल इमारत अद्ययावतीकरण, वसतिगृहाच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, रेनवॉटर हार्वेस्टींग करणे, विविध खेळाची मैदानांचा समावेश. (क्रीडा विभाग)

अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ अंतर्गत मुक्तबंदी व परिविक्षाधीन बंदी यांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदान योजनेच्या रक्कमेत दुप्पटीने वाढ. निर्दोष सुटलेल्या बंद्यांचा योजनेत समावेश करुन योजनेअंतर्गत सहायक अनुदान आता पंचवीस वरून पन्नास हजार रुपये इतकी वाढ. (महिला व बाल विकास)

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या – एसटीच्या

# क्रिकेटपटूची हत्या, फसवून बोलवले अन् केला गोळीबार

### पाकिस्तान लष्कराविरोधात संतापाची लाट, POKमध्ये आंदोलन

**इस्लामाबाद :** पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरमध्ये (PoK) पुन्हा एकदा तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. रावळकोट येथे वीज, पाणी आणि इतर मूलभूत सुविधांच्या मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर पाकिस्तान सैन्याने गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत स्थानिक क्रिकेटपटू वाजिद हयात याच्यासह चार जणांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात येत आहे. या घटनेनंतर संपूर्ण पीओकेमध्ये संतापाची लाट उसळली असून आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**शांततापूर्ण आंदोलनावर कारवाई झाल्याचा आरोप**

रावळकोटमधील मटियालमीरा बस टर्मिनल परिसरात गेल्या काही दिवसांपासून नागरिकांचे आंदोलन सुरू होते. आंदोलनकर्त्यांच्या मते त्यांची मागणी केवळ स्वस्त वीज, स्वच्छ पाणी, स्वस्त दरात पीठ आणि इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून



देण्याची होती. या मागण्यांसाठी नागरिक शांततेच्या मार्गाने धरणे आंदोलन करत होते. स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार जम्मू-काश्मीर जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी (JAAC) आणि पाकिस्तान सरकार तसेच सैन्याचे अधिकारी यांच्यात आंदोलनाबाबत चर्चाही सुरू होती. मात्र चर्चेला यश येत नसतानाच मंगळवारी सकाळी सैन्याने आंदोलनस्थळाला वेढा घातल्याचा आरोप करण्यात आला आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यांनुसार आंदोलनकर्त्यांना हटवण्यासाठी अश्रुधूराचा वापर न करता थेट गोळीबार करण्यात आला. या कारवाईत अनेक जण गंभीर जखमी झाले असून चार जणांचा मृत्यू झाल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे.

# जेसीबीच्या खोदकामामुळे गॅस पाइपलाइन फुटली; मोठी दुर्घटना टळली!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एमआयडीसी वाळूज परिसरातील लुमॅक्स कंपनीसमोर (प्लॉट क्र. B-14/2) मंगळवारी दुपारी एक मोठी दुर्घटना टळली. पाण्याच्या पाइपलाइनसाठी जेसीबीद्वारे सुरू असलेल्या बेजबाबदार खोदकामामुळे भारत पेट्रोलियमची भूमिगत पीएनजी गॅस पाइपलाइन फुटली. पाइपलाइन फुटल्याने प्रचंड वेगाने गॅस गळती सुरू झाली, ज्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे आणि खळबळजनक वातावरण निर्माण झाले होते. मात्र, प्रशासनाच्या तत्परतेमुळे पुढील अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी सुमारे १.१५ वाजेच्या सुमारास लुमॅक्स कंपनीसमोरील रस्त्यावर पाण्याच्या पाइपलाइनसाठी जेसीबीच्या साहाय्याने खोदकाम सुरू होते. यावेळी जमिनीखाली असलेल्या बीपीसीएलच्या मुख्य पीएनजी गॅस पाइपलाइनला



जेसीबीचा जोरदार धक्का लागला आणि पाइपलाइनला मोठे भगदाड पडले. पाइपलाइन फुटताच गॅसचा मोठा फवारा हवेत उडू लागला आणि परिसरात गॅसचा वास पसरला. गॅस गळतीची माहिती मिळताच वाळूज एमआयडीसी अग्निशमन दल आणि भारत पेट्रोलियमच्या देखभाल व दुरुस्ती पथकाने घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गॅस पुरवठा खंडित बीपीसीएलच्या पथकाने तात्काळ युद्धपातळीवर हालचाली करत मुख्य व्हॉल्व्ह बंद केला आणि गॅस पुरवठा खंडित केला. सुरक्षा उपाय अग्निशमन दलाच्या जवानांनी हवेत पसरणारा गॅस दाबण्यासाठी आणि आग लागण्याचा धोका टाळण्यासाठी घटनास्थळावर पाण्याचा जोरदार मारा सुरू केला. हा औद्योगिक परिसर असल्याने आणि दुपारी कामाची वेळ असल्याने परिसरात मोठी वर्दळ होती. सुदैवाने, गॅस गळती सुरू झाल्यानंतर परिसरात कोणतीही ठिणगी पडली नाही, अन्यथा मोठा स्फोट होऊन मोठी जीवितहानी झाली असती. अग्निशमन दल आणि बीपीसीएलच्या वेळेत मिळालेल्या प्रतिसादामुळे परिस्थिती नियंत्रणात आली आणि सर्वांनी सुटकेचा

# मराठी येत नाही म्हणून हायकोर्टानं दिला जामीन! नागपूर हायकोर्टाचा मोठा निर्णय

**नागपूर :** ड्रग्स प्रकरणातील ओडिसाच्या एका आरोपीला मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने जामीन मंजूर केला. जामीन मंजूर करताना जे कारण दिलं त्याची सगळीकडे चर्चा सुरू झाली आहे. या जामिनामागील कारण खूपच वेगळं आणि गंमतीशीर आहे. या आरोपीला स्थानिक भाषा म्हणजेच मराठी अजिबात समजत नव्हती. भाषाच समजत नसल्याने त्याला स्वतःचा बचाव करण्यासाठी योग्य ती कायदेशीर मदत मिळवता आली नाही. कोर्टाने यावर स्पष्ट सांगितलं की, कायद्याच्या किचकट तांत्रिक नियमांपेक्षा संविधानाने माणसाला दिलेले हक्क जास्त महत्त्वाचा आहे.

संविधानाने देशातील प्रत्येक आरोपीला आपली बाजू मांडण्याचा आणि आपल्यावर नेमके काय आरोप झालेत, हे नीट समजून घेण्याचा पूर्ण अधिकार दिला आहे. या आरोपीला मराठी येत नसल्याने त्याच्या या हक्काचा संकोच होत होता, हे लक्षात घेऊन कोर्टाने त्याला जामीन दिला.

# अशोक खरातचा जेलमध्ये नवा बिझनेस

**नाशिक :** आपल्याकडे दैवीशक्ती असल्याचे भासवून शेकडो महिलांवर अत्याचार केल्याचा आरोप नाशिकच्या अशोक खरातवर आहे. लैंगिक अत्याचार तसेच आर्थिक फसवणूक प्रकरणातील दाखल असलेल्या गुन्ह्यात अशोक खरात चार महिन्यापासून जेलची हवा खात आहे. लोकांचे भविष्य सांगणाऱ्या भोंदू खरात शंभर दिवसाहून अधिक दिवस जेलमध्ये असून जेलमध्ये त्याने नवा बिझनेस सुरू केला आहे.



एका वर्तमानपत्राला जेलमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार खराचा जेलमध्ये मोठा दरारा आहे. जेलमधील कर्मचारी आणि इतर कैद्यांच्या प्रश्नांना अशोक खरात प्रचंड वैतागला असून सध्या त्याने मौन धारण केले आहे. खरातला जेव्हा जेलमधील इतर कर्मचारी भेटता त्यावेळी ते खरातला त्यांच्या भविष्याविषयी किंवा त्यांच्या कारनाम्यासंदर्भातील प्रश्न विचारतात. मात्र अता खरातला जेल प्रशासनाने वेगळ्या बराकीत ठेवले आहे जेणेकरून इतर कर्मचारी त्याला त्रास देणार नाही. सतत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांमुळे खरातने देखील मौन धारण केले आहे.

# मराठवाड्यातून मुंबईचा प्रवास सुसाट, रेल्वेचा वेग दुप्पट वाढणार

**छत्रपती संभाजीनगर:** मराठवाड्यातून मुंबईचा प्रवास आता आणखी सोपा होणार आहे. छत्रपती संभाजीनगर-अंकाई रेल्वेमार्गाचं दुहेरीकर कामाबाबात महत्त्वाचं अपडेट आहे. रेल्वेच्या गेमचेंजर प्रकल्पाने गती घेतली असून जवळपास 60 टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम देखील लवकरच पूर्ण होणार असून जून 2027 पर्यंत काम पूर्ण करण्याचं लक्ष ठेवण्यात आलंय. विशेष म्हणजे हे काम पूर्ण झाल्यानंतर रेल्वेचा वेग दुप्पट वाढणार आहे.

छत्रपती संभाजीनगर-अंकाई (मनमाड) रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी मोठ्या प्रतीक्षेनंतर 2021 मध्ये मान्यता मिळाली. त्यानंतर दुहेरीकरणाच्या कामाला काही दिवसांतच मंजुरी मिळाली. निविदा प्रक्रिया होऊन नोव्हेंबर 2024 मध्ये प्रत्यक्ष दुहेरीकरणाचे काम सुरू करण्यात आले.

दोन टप्प्यांत काम

कामाची गती वाढण्यासाठी अंकाई ते करंजगाव आणि करंजगाव ते संभाजीनगर अशा दोन टप्प्यांत काम सुरू आहे. यासाठी अंकाई ते करंजगाव आणि करंजगाव ते छत्रपती संभाजीनगर अशा 438 कोटी आणि 434 कोटी रुपयांच्या दोन स्वतंत्र निविदा प्रक्रिया देखील राबविण्यात आल्या.

दरम्यान, आता नगरसोल – तारुर - रोटेगाव आणि लासूर - पोटूळ-दौलताबाददरम्यान सध्या दुहेरीकरणाचे काम सुरू आहे. या दुहेरीकरणाबरोबरच विद्युतीकरणाचे काम देखील हाती घेण्यात आले आहे. यात लासूर ते पोटूळ दरम्यानचे 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे या मार्गावरील सर्व पूल, मातीचे भराव टाकण्याचे काम पूर्ण झाले असून आता रेल्वे रूळ टाकणे, विद्युतीकरण आणि सिग्नल यंत्रणा उभारण्याचा कामाला गती दिली आहे

# जेलीफिशचा दंश अन् हातावर 11 शस्त्रक्रिया, पण तिनं हार नाही मानली, आता पुणेकर गीताचा जगात डंका

**पुणे :** जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या जोरावर कोणतेही स्वप्न पूर्ण करता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण पुण्याच्या मुळशी तालुक्यातील जलतरणपटू गीता महेश मालुसरे हिने घालून दिले आहे. जेलीफिशच्या विषारी दंशामुळे एका हातावर तब्बल 11 शस्त्रक्रिया झाल्यानंतरही हार न मानता गीताने इंग्लिश चॅनेल यशस्वीरीत्या पार करत इतिहास रचला आहे. 27 जून रोजी तिने इंग्लिश चॅनेलचे आव्हान पूर्ण केले. समुद्रातील प्रचंड लाटा आणि प्रवाहामुळे 35 किलोमीटरचे अंतर प्रत्यक्षात 54 किलोमीटरपर्यंत वाढले आणि गीता हे अंतर 14 तास 31 मिनिटांत पोहत पूर्ण करण्यात यशस्वी ठरली.

इंग्लिश चॅनेल स्विमिंग असोसिएशनच्या देखरेखीखाली ही मोहीम पार पडली. गीता आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक शेखर खासनीस आणि प्रतीक जावडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून कठोर सराव करत आहे. तिच्या या यशाचे क्रीडा क्षेत्रातून आणि विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

**शेती विकली, घर गहाण ठेवले, शेतकऱ्याचा मुलाचा अन्नभेसळीविरोधात जनजागृतीचा निर्धार, काढला चित्रपट**

मुळशीतील गीता ही लहानपणापासूनच जलतरणाशी जोडली गेली. अवघ्या तीन वर्षांची असताना तिच्या वडिलांनी तिला पोहण्याचे प्रशिक्षण सुरू करून दिले. वयाच्या पाचव्या वर्षी तिने पहिल्याच स्पर्धेत पदक जिंकले आणि त्यानंतर जलतरणाची आवडच तिच्या ध्येयात बदलली. वयाच्या आठव्या वर्षीच इंग्लिश चॅनेल पार करण्याचे स्वप्न तिने मनाशी पक्के केले होते.



मात्र, तिचा प्रवास अजिबात सोपा नव्हता. 2020 आणि 2021 मध्ये कोरोनामुळे तिच्या सरावात दोन वर्षांचा खंड पडला. त्यानंतर 2022 मध्ये रत्नागिरी येथे खुल्या समुद्रातील स्पर्धेदरम्यान जेलीफिशच्या विषारी दंशामुळे तिच्या हाताला गंभीर दुखापत झाली. परिस्थिती इतकी गंभीर होती की हात गमावण्याची वेळ आली होती. एका वर्षात तिच्यावर तब्बल 11 शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे तिचे जलतरण कारकीर्द संपल्याची भीती व्यक्त केली जात होती.

शस्त्रक्रियेनंतर जवळपास वर्षभर सराव बंद होता. मात्र, गीताने हार मानली नाही. सुरुवातीला केवळ 30 मिनिटांपासून पुन्हा सराव सुरू केला. जखमांमधून रक्त येत असतानाही ती नियमित सराव करत राहिली. उजव्या हातावरील दुखापतीमुळे तिने डाव्या हातावर अधिक भर दिला, त्यामुळे खांद्यालाही दुखापत झाली. तरीही तिचे लक्ष फक्त इंग्लिश चॅनेलच्या ध्येयावर केंद्रित होते.

या मोहिमेसाठी तिने दररोज पाच ते आठ तास, तर आठवड्याच्या शेवटी दहा ते बारा तास कठोर सराव केले. थंड पाण्याची सवय व्हावी म्हणून रात्रीच्या वेळी सराव करण्यात आला. इंग्लंडला जाण्यापूर्वीही जेलीफिशचा पुन्हा दंश झाला होता. डॉक्टरांनी आवश्यक औषधोपचार आणि खबरदारी घेण्याचा सल्ला दिला. तरीही कोणत्याही भीतीला न जुमानता गीताने स्पर्धा पूर्ण करण्याचा निर्धार कायम ठेवला.

गीताचे प्रशिक्षक प्रतीक जावडेकर यांनी सांगितले की, इंग्लिश चॅनेल हे जगातील सर्वात कठीण जलतरण आव्हानांपैकी एक आहे. थंड पाणी, अनिश्चित हवामान, भरती-ओहोटी आणि समुद्रातील प्रवाह यामुळे या स्पर्धेसाठी वेगळ्या प्रकारचा सराव आवश्यक असतो. यासाठी हिमालयीन भागातील थंड पाण्यात तसेच रात्रीच्या वेळी खुल्या पाण्यात विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

इंग्लिश चॅनेल पार केल्यानंतर आता गीताचे पुढील ध्येय 'क्वीन ऑफ ओशन' हा बहुमान मिळवण्याचे आहे. त्यासाठी तिला जगातील सात प्रमुख समुद्री खाड्या पार करायच्या आहेत. याच मोहिमेअंतर्गत सप्टेंबरमध्ये अमेरिकेतील कॅटालिना चॅनेल आणि ऑक्टोबरमध्ये न्यूयॉर्कमधील 'ट्वेंटी ब्रिजेस' जलतरण स्पर्धेत ती सहभागी होणार आहे. तिची ही प्रेरणादायी यशोगाथा आजच्या युवा पिढीसाठी जिद्द, सातत्य आणि आत्मविश्वासाचा आदर्श ठरत आहे.

# संपादकीय

## कोरोनाचे पुनरागमन की केवळ वैद्यकीय वास्तव?

आंध्र प्रदेशात कोरोनाची लागण झालेल्या दोन रुग्णांच्या मृत्यूनंतर देशातील आरोग्य वर्तुळात पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. समाजमाध्यमांवर आणि सर्वसामान्यांमध्ये "हा पुन्हा लॉकडाऊन लावण्याचा कट तर नाही ना?" किंवा "प्रशासन आणि प्रसारमाध्यमे मिळून जनतेला घाबरवत आहेत का?" अशा प्रकारच्या शंका-कुशंका उपस्थित केल्या जात आहेत. दोन वर्षांनंतर कोरोनामुळे मृत्यू झाल्याची नोंद झाल्याने नागरिकांमध्ये अशी भीती किंवा संशय निर्माण होणे साहजिक असले, तरी या विषयाकडे केवळ भीती किंवा षडयंत्राच्या चष्म्यातून न पाहता, उपलब्ध वैद्यकीय वास्तवाच्या आधारे अत्यंत संयमाने पाहण्याची गरज आहे. वैद्यकीय अहवालानुसार, ज्या दोन व्यक्तींचा मृत्यू झाला, ते केवळ कोरोनामुळे झालेला नाही. मृत पावलेले रुग्ण हे आधीच मधुमेह, मूत्रपिंडाचे आजार किंवा तीव्र न्यूमोनिया यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त होते. अशा परिस्थितीत शरीराची रोगप्रतिकारक शक्ती अत्यंत कमकुवत होते आणि कोणताही संसर्ग जीवघेणा ठरू शकतो. आरोग्य विभागाने स्पष्ट केल्याप्रमाणे, या केसेस अत्यंत तुरळक (स्पोरॅडिक) स्वरूपाच्या आहेत. याचा अर्थ असा की, हा कोणत्याही प्रकारचा साथीचा उद्रेक नाही. त्यामुळे पुन्हा लॉकडाऊन लागेल किंवा जुने निर्बंध परत येतील, अशी भीती बाळगणे पूर्णपणे निरर्थक आणि घाईचे ठरेल. प्रशासनाने सतर्कता दाखवत या रुग्णांचे नमुने पुण्यातील राष्ट्रीय विषाणू संस्थेकडे (एनआयव्ही) जिनोम सिक्वेन्सिंगसाठी पाठवले आहेत, जेणेकरून हा कोणताही नवीन व्हेरिएंट नाही ना, याची खात्री करता येईल. ही एक नियमित वैद्यकीय प्रक्रिया आहे, जी भविष्यातील सुरक्षेसाठी आवश्यक असते. प्रसारमाध्यमे आणि सरकारने अशा बातम्या देताना जनतेमध्ये घबराट निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. त्याच वेळी, नागरिकांनीही कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत घाबरून जाण्याचे कोणतेही कारण नसून, केवळ आरोग्याची सामान्य काळजी घेणे पुरेसे आहे.

## ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई: 21 गोवंश जनावरांची सुटका, 24.45 लाखांचा मुद्देमाल जप्त

पान 1 वरून ->

आणि १८ लाख रुपये किमतीचा आयशर कंटेनर असा एकूण २४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ४३२/२०२६ अन्वये प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९७६ च्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपीचा शोध सुरू असून या बेकायदेशीर वाहतुकीमागे कोणती मोठी साखळी कार्यरत आहे, याचा सखोल तपास चिकलठाणा पोलीस करत आहेत.

विशेष म्हणजे, जिल्हा ग्रामीण पोलिसांनी १ जून ते १३ जुलै या दीड महिन्याच्या कालावधीत गोवंश आणि गोमांस तस्करीशी संबंधित तब्बल १३ गुन्हे दाखल करून २० आरोपींवर कारवाई केली आहे. या मोहिमेत आतापर्यंत ४१ जनावरांची सुटका करण्यात आली असून १५२० किलो गोमांस आणि १० वाहने जप्त करण्यात आली आहेत, ज्याची एकूण किंमत ५३ लाख १७ हजार ७०० रुपये आहे. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारच्या संघटित गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीची गय केली जाणार नाही आणि भविष्यातही अशा विशेष कारवाया व नाकाबंदीचे सत्र सातत्याने सुरूच राहील.

# मनांच्या अंधारात माणुसकीचा दिवा

जग जवळ आले आहे, असे आपण अभिमानाने म्हणतो. एका बोटाच्या स्पर्शाने सातासमुद्रापारचा चेहरा पडद्यावर उमटतो; पण शेजारी बसलेल्या माणसाच्या मनावर दाटलेले दुःखाचे ढग आपल्याला दिसत नाहीत. मोबाईलमध्ये हजारो संपर्क, समाजमाध्यमांवर शेकडो मित्र, तरी मनाच्या मध्यरात्री हक्काने फोन करावा, असा एक विश्वासू माणूस कितीजणांच्या आयुष्यात आहे?

आज चेहऱ्यांना 'फिल्टर' आहेत; मनांना नाहीत. डीपीवर रुबाब, ओठांवर हास्य, स्टेटसवर सुविचार आणि कुणी विचारले, "कसं चाललंय?" की उत्तर तयार—"एकदम मस्त!" मोबाईलची बॅटरी दहा टक्क्यांवर आली की चार्जर शोधताना घर पालथे घालतो; पण मनाची बॅटरी एक टक्क्यावर आली तरी 'ऑल इज वेल'चा झेंडा फडकवत राहतो.

ओठ हसतात, डोळे फसतात;
मौनाच्या गर्भात वादळे वसतात!

माणूस दुःख सांगायला घाबरतो. आपली वेदना कुणाच्या गप्पांचा मसाला, कुणाच्या कुत्सित आनंदाची मेजवानी किंवा कुणाच्या अहंकाराचे खत बनेल, ही भीती त्याला मौनाच्या गुहेत ढकलते. प्रत्येक शांत माणूस समाधानी नसतो. काही अश्रू डोळ्यांतून वाहत नाहीत; ते मनाची माती आतून खारट करीत राहतात.

आज कार्यालय, व्यवसाय, कला, साहित्य, राजकारण असो वा समाजकारण—स्पर्धेने अनेकदा सहवेदनेची वाट अडवली आहे. दुसरा पुढे गेला की हात टाळ्या वाजवतात; पण मनातला छोटासा 'हिशेबनीस' चष्मा सरकवत विचारतो—"यालाच कसं काय?" कोणी घसरले की आधी हसू फुटते, मग हात पुढे जातो. हसू चालेल; पण पडलेल्याला उचलणारा हात हरवला, तर खरे माणूसपण पोकळ ठरेल.

पद, पैसा, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा ही जीवनवृक्षावरची पाने आहेत; माणुसकी ही त्याची मुळे आहेत. पाने गळतात, ऋतू बदलतात, वादळे येतात; पण मुळे जिवंत असतील, तर झाड पुन्हा पालवी धरते. कुणाकडे आलिशान मोटार, कुणाकडे जुनी सायकल; तरी सूर्य दोघांच्या अंगणात सारखाच उतरतो. टेरेस विकत घेता येते; आकाश नाही. घराला कुलूप लावता येते; क्षितिजाला नाही!

मैत्री म्हणजे वाढदिवसाचा केक, सेल्फी किंवा व्हॉट्सॲपवर रोज उगवणारी 'गुड मॉर्निंग'ची फुले नव्हेत. मित्राच्या "मी ठीक आहे"मधील न-ठीकपणा ओळखणे, त्याच्या मौनातील हुंदका ऐकणे आणि संकटाच्या क्षणी हिशेबाची वही मिटून शेजारी उभे राहणे—ही मैत्रीची खरी श्रीमंती. पैसा खिसा भरतो; माणसे आयुष्य भरतात.

प्रत्येक दुःखी माणसाला उपदेश नको असतो. कधी उत्तरांपेक्षा ऐकणारा कान अधिक मोलाचा असतो. "मी आहे तुझ्यासोबत" हे चार शब्द औषधालयात मिळत नाहीत; पण मनाच्या अदृश्य जखमांवर त्यांचे मलम विलक्षण असते. एखाद्याला वाचवण्यासाठी नेहमी मोठे भाषण लागत नाही; कधी प्रेमाने विचारलेले "खरंच, तू ठीक आहेस ना?" एवढेच पुरते.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता वेगाने वाढत आहे; मानवी हृदय मात्र कृत्रिम होता कामा नये. युद्धे, विस्थापन, आर्थिक विषमता, बेरोजगारी, एकटेपणा आणि मानसिक ताण यांनी जगभरच्या मनांवर सावल्या पसरवल्या आहेत. अशा वेळी करुणा ही कमजोरी नाही; ती मानवतेची मातृभाषा आहे. धर्म, देश, भाषा, वर्ण यांच्या सीमा नकाशावर असतील; अश्रूंची चव आणि मायेची ऊब मात्र सर्वत्र सारखीच असते.

मनाशी मन जुळू दे,
दुःख थोडे विरू दे;
हातात हात राहू दे,
माणूस माणसात उरू दे!

कुणाचा न्याय करण्यापूर्वी त्याच्या आयुष्याचे एक अश्रुभिजलेले पान वाचू या. पाठीमागे कुजबुजण्याऐवजी समोर बोलू या. गैरसमजांच्या भिंती तोडून संवादाच्या खिडक्या उघडू या. कारण प्रत्येक हसरा चेहरा सुखी नसतो आणि प्रत्येक शांत माणूस समाधानी नसतो.

आपल्यामुळे कुणाचा 'गेम' झाला, यात विजय कसला? आपल्यामुळे विझत्या मनात आशेची वात पेटली, थकलेल्या चेहऱ्यावर हसू उमलले आणि एकाकी जीवाला "मी एकटा नाही" असे वाटले—हेच खरे जिंकणे!

द्वेष विरू दे, प्रेम उरू दे;
मनामनांत माणूसपण भरू दे.
जगू या, जगवू या, सोबत चालू या—
मनांच्या अंधारात माणुसकीचा दिवा होऊ या!

- पांडुरंग मारुती धुमाळ

# आईच्या आजरपणातून सुचली आयडिया, शेवगा प्रॉडक्टने बदलले नशीब, वर्षाला 15 लाखांची उलाढाल

**अमरावती :** मोर्शी तालुक्यातील अडगाव हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित झालेले गाव आहे. या गावातील सचिन देविदासराव वानखडे हे एक शेतकरी पुत्र. वडिलांची 15 एकर शेती त्यांच्याकडे आहे. त्या शेतात ते पारंपरिक पिकं घेत होते. 2011 मध्ये त्यांनी 3 एकर शेतामध्ये शेवगा लागवड केली. शेतीसोबतच त्यांना ॲनिमेशनमध्येही आवड होती. त्यामुळे त्यांनी मुंबईला प्रोड्युसरच्या हाताखाली काम करण्यास सुरुवात केली. 5 दिवस मुंबईला नोकरी आणि 2 दिवस गावाकडे शेती ते करीत होते. लग्नानंतर पत्नीसह ते मुंबईला होते. अधूनमधून शेताकडे लक्ष त्यांचं होतं. पण, नंतर कोरोना काळात त्यांना गावी परतावं लागलं.

आईच्या आजारपणामुळे सुचली व्यवसायाची कल्पना

गावी परतल्यानंतर त्यांनी पूर्ण वेळ शेतीला दिला. अशातच त्यांच्या आईला हाडाचे दुखणे सुरू झाले. खूप औषध घेतली. पण आराम मिळाला नाही. डॉक्टरांनी ऑपरेशन सांगितले होते. अशातच सचिन यांना मोरिंगा पावडरविषयी माहिती मिळाली. त्यामुळे दुखणे बरे होण्याची शक्यता असते म्हणून त्यांनी मुंबईवरून ते पावडर आईसाठी बोलावले. औषध आणि मोरिंगा पावडर हे दोन्ही उपचार आईवर चालू होते. काही दिवसांनी आईचे दुखणे बरे झाले. पण, नेमके औषधं घेऊन बरे झाले की मोरिंगा घेतल्याने? हा प्रश्न होता. त्यानंतर शेतातील शेवग्याची पावडर बनवून नातेवाईकांना दिली. त्यांनाही त्यातून फायदा झाला. त्यानंतर या व्यवसायाची कल्पना आम्हाला सुचली.

शेवग्यापासून विविध प्रॉडक्ट

शेवग्याला अमरावती मार्केटमध्ये भाव मिळत नव्हताच, त्यामुळे मग त्यापासून लाडू, पावडर, ग्रीन टी, अर्क, साबण, शाम्पू, सरबत पावडर हे प्रॉडक्ट तयार करायला सुरुवात केली. यासाठी कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूर येथे ट्रेनिंग घेतले. बचत गटांशी जुळलो. प्रॉडक्ट 100 टक्के नैसर्गिक असल्याचे सर्टिफिकेट मिळवले. त्यानंतर ऑनलाईन आणि ऑफलाईन विक्री सुरू केली.

व्यवसायातून वर्षाला 12 ते 15 लाखांची उलाढाल

बचत गटांच्या माध्यमातून मुंबईला होणारे स्टॉल अटेंड केले. महालक्ष्मी सरस या प्रदर्शनीमध्ये सलग 3 वर्ष नावीन्यपूर्ण प्रॉडक्ट म्हणून पुरस्कार मिळाले. नवनवीन लोकांशी कॉन्टॅक्ट वाढलेत. असा हा व्यवसाय आमचा वाढत गेला. या व्यवसायात 3 एकर शेतीत वर्षाला आम्हाला 12 ते 15 लाखांची उलाढाल होते.

व्यवसायात लागणारा कच्चा माल सुद्धा शेतातच

या व्यवसायासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची शेतात लागवड केली जाते. कोरफड, तुळशी, गवती चहा, शेवगा, मेथी आणि इतर सर्व कच्चा माल शेतात पिकवला जातो. त्यासाठी कुठलेही रसायन वापरत नाही. निंबोळी अर्क यासारखे आणखी काही नैसर्गिक द्रव्य वापरूनच 3 एकर शेती करत आहेत.

## जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न; विकासकामांची गुणवत्ता व वेळेत अंमलबजावणीस प्राधान्य द्यावे – पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** जिल्हा वार्षिक योजने (2026-27) अंतर्गत परभणी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत अंमलबजावणी करण्यावर भर द्यावा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

जिल्हा नियोजन सभागृहात पालकमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती लता वाकळे, विधान परिषद सदस्य सईद खान, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार राजेश विटेकर, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश वाघमारे, प्रकल्प संचालक रश्मी खांडेकर आदींसह विविध विभागांचे प्रमुख तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार संजय जाधव, पालक सचिव चंद्रकांत पुलकुंडवार व इतर लोकप्रतिनिधी-अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित पायाभूत सुविधा, सिंचन, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, रस्ते व पाणीपुरवठा, खरीप हंगामासाठी आवश्यक खतसाठा व त्याचा पुरवठा, पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास आराखडा, पीककर्ज वितरण, वीज वितरण व्यवस्था, पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजनेसह केंद्र व राज्य शासनाच्या विविध घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घरबांधणीसाठी जिल्ह्यात असलेली वाळू उपलब्धता, अंगणवाडी सुविधा तसेच विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

पर्यटनवाढीसाठी जिल्ह्यातील संत जनाबाई आणि साईबाबा यांचे जन्मस्थानाचा सुधारित विकास आराखडा सादर करताना पर्यटनस्थळे आणि तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी त्यांची यादी तयार करण्याचे निर्देश पालकमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. पर्यटन विकासासोबत तीर्थक्षेत्रांचा समावेश असलेला स्वतंत्र आराखडा तयार करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

पावसाच्या खंडामुळे दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण झाल्यास कृषी विभागाने तात्काळ पंचनामे व माहिती संकलित करून जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. तसेच जिल्ह्यात डीएपी आणि युरीया खत साठा आणि पुरवठ्याचे वितरण समान होत असल्याची खात्री करून घ्यावी. प्रसंगी भरारी पथके नेमून तपासणी करण्याचे निर्देशही दिले. शेतकऱ्यांना पीककर्ज मंजूर करताना बँका नकार देत असल्याचा लोकप्रतिनिधींनी मुद्दा उपस्थित केल्यावर पालकमंत्र्यांनी तात्काळ बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या.

गंगाखेड शहरात सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे, अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करणे, ट्रान्सफॉर्मर बसविणे, 65 गावांच्या पाणीपुरवठा योजनांना गती देणे आदी विषयांवरही चर्चा झाली. जिल्ह्यातील 52 माध्यमिक शाळांच्या जीर्ण इमारतींच्या दुरुस्ती अथवा नव्या इमारतींच्या बांधकामाचा आढावा घेण्यात आला. त्यापैकी 17 शाळांसाठी नवीन इमारती उभारण्याबाबत संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले. जिल्ह्यातील 1690 अंगणवाडी केंद्रांमध्ये पाणीपुरवठा, शौचालय व परसबाग यांसारख्या मूलभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. शहरी भागात नवीन अंगणवाडी सुरू करण्यासाठी योग्य जागांची पाहणी करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

बैठकीत विधान परिषद सदस्य सईद खान यांनी मुदगल, लासिना, डाकू पिंपरी, पेडगाव आदी भागांतील अवैध रेतीउपशाचा मुद्दा उपस्थित केला. यावर जिल्हा प्रशासन आणि पोलिस विभागाच्या योग्य समन्वयातून तातडीने कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी स्पष्ट केले. घरकुल लाभार्थ्यांना 30 सप्टेंबरपर्यंत वाळू उपलब्ध करून देण्यासाठी 42 रेतीघाटांवरील साठ्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

नुकत्याच झालेल्या पाऊस व वादळी वाऱ्यामुळे काही शेतकऱ्यांच्या शेडनेटचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले याबाबत आमदार राजेश विटेकर यांनी कृषि विभागाने याचा सकारात्मक अहवाल पाठविण्याच्या कृषि विभागाला सूचना केल्या.

राज्य शासनाच्या वृक्षलागवड अभियानांतर्गत जिल्ह्यास पडीक जमिनीवर 1 लाख 14 हजार, सामाजिक वनीकरण विभागामार्फत 3 लाख आणि प्रादेशिक वन विभागामार्फत 8 लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. नागरिकांना सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध करून देण्यात येत असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच अंगणवाड्यांना फळझाडे वितरीत करण्यासोबतच शेताच्या बांधावर फळझाडे लागवड करण्यासाठी शेतक-यांना रोपे वितरीत करण्याचे वनविभागाला निर्देश दिले.

## ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन योजना अंतर्गत सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठी पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांकडून 31 जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.


या योजनेचा उद्देश राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना आर्थिक सहाय्य प्रदान करून त्यांच्या कला व साहित्य क्षेत्रातील योगदानाचा गौरव करणे हा आहे. साहित्य किंवा कला क्षेत्रात आयुष्य समर्पित केलेल्या आणि सध्या आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या पात्र साहित्यिक व कलाकारांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

योजनेअंतर्गत अर्जदाराचे वय 50 वर्षांपेक्षा अधिक असावे. दिव्यांग अर्जदारांसाठी वयोमर्यादेत 10 वर्षांची शिथिलता देण्यात आली असून, त्यांच्यासाठी किमान वय 40 वर्षे आहे. अर्जदाराने साहित्य किंवा कला क्षेत्रात किमान 15 वर्षांचे योगदान दिलेले असावे. साहित्य-कला क्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व मोलाचे कार्य करणारे, वयाने ज्येष्ठ, विधवा, परित्यक्ता व दिव्यांग कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न सर्व मार्गांनी मिळून 60 हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. तसेच अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक असून, केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेचा लाभ घेत नसावा.

**इच्छुक व पात्र साहित्यिक व कलाकारांनी http:**/aaple-sarkar.mahaonline.gov.in/en या संकेत स्थळावर 31 जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावा. ऑनलाइन अर्जाची प्रिंट व अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती संबंधित पंचायत समिती कार्यालयात जमा कराव्यात.

अर्जासोबत वयाचा दाखला, आधार कार्ड, मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, लाभ न घेतल्याचे नोटरी सह प्रतिज्ञापत्र, बँक पासबुक, आवश्यक असल्यास अपंगत्वाचा दाखला, राज्य अथवा केंद्र शासनाचे प्रमाणपत्र, शिफारसपत्र तसेच कला किंवा साहित्य क्षेत्रातील योगदानाचे पुरावे स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे.

योजनेची सविस्तर माहिती, नियम व अटी सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अपूर्ण, ऑफलाइन अथवा मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. यापूर्वी अर्ज केलेल्या पात्र व इच्छुक साहित्यिक व कलाकारांनीही नव्याने अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.



## रायगड जिल्ह्यात पावसाचा लपंडाव, पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे

### उशिरा हजेरी, आठवडाभर मुसळधार, आणि आता अचानक विश्रांती... शेतकरी चिंतेत

**बोरघर माणगांव ( विश्वास गायकवाड*) :** साऱ्या जगाचा पोशिंदा बळीराजा पुन्हा एकदा निसर्गाच्या लहरीपणामुळे अडचणीत सापडला आहे. रायगड जिल्ह्यात यंदा मान्सूनने उशिरा हजेरी लावली. त्यानंतर सलग एक आठवडा कोसळलेल्या मुसळधार पावसाने शेतीचे प्रचंड नुकसान केले. जनजीवन विस्कळित झाले. मात्र शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी आशा असतानाच पाऊस अचानक गायब झाला आहे. यामुळे पेरणी, भातलावणी आणि इतर शेतीची कामे रखडली असून काही भागात दुबार पेरणीचे संकट उभे राहिले आहे.

*उशिरा आला, पण सर्वत्र धुमाकूळ घालून गेला*

जिल्ह्यात जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यापर्यंत पावसाची प्रतीक्षा होती. 20-25 जूनच्या दरम्यान पाऊस दाखल झाला आणि थेट धोधो बरसू लागला. अलिबाग, माणगाव, महाड, पोलादपूर, रोहा या तालुक्यांमध्ये 7 दिवसांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला.

**या अति पावसामुळे :**

- ***भातशेतीचे नुकसान*** : नुकत्याच केलेल्या पेरण्या आणि रोपे पाण्यात गेली. अनेक शेतात पाणी साठल्याने बियाणे कुजले.
- ***भूस्खलन आणि रस्ते बंद*** : डोंगराळ भागात ठिकठिकाणी मातीचे ढिगारे कोसळले. गावांचा संपर्क तुटला.
- ***जनजीवन विस्कळित*** : शाळा, बाजारपेठा आणि दळणवळणावर परिणाम झाला. नदी-नाल्यांना पूर आला.

*आता अचानक पावसाची दडी*

शेतकरी म्हणत होते "आता पाऊस नियमित पडेल आणि कामे मार्गी लागतील". पण गेल्या 3-4 दिवसांपासून जिल्ह्यातून पाऊस अचानक गायब झाला आहे. आकाश निरभ्र झाले असून कडक ऊन पडू लागले आहे.

**याचा थेट फटका शेतीला बसला आहे :**

1. ***शेतीची कामे ठप्प*** : भाताची रोपे लावणी, भांगलणी, खत देणे ही कामे अर्धवट राहिली आहेत.
2. ***दुबार पेरणीचे संकट*** : पाण्याअभावी पहिल्या पेरणीतील बियाणे उगवले नाही. आता पुन्हा पेरणीसाठी बियाणे आणि पैसा लागणार.
3. ***कर्जाचा बोजा वाढला*** : आधीच नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान, त्यात आता अतिरिक्त खर्च.

*बळीराजा मदतीच्या प्रतीक्षेत*

पावसाच्या या अनियमिततेमुळे रायगडच्या शेतकऱ्यांवर दुहेरी संकट आले आहे. एकीकडे अति पावसामुळे नुकसान, दुसरीकडे पावसाच्या खंडामुळे रखडलेली कामे.

शेतकरी संघटनांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. शासनाने तात्काळ मदत जाहीर करावी, बियाणे आणि खतांवर अनुदान द्यावे, आणि दुबार पेरणीसाठी विशेष पॅकेज जाहीर करावे अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

हवामान विभागाने पुढील 2-3 दिवसात तुरळक पाऊस पडण्याचा अंदाज दिला आहे. मात्र तो शेतीसाठी पुरेसा आहे का, याबत शेतकरी साशंक आहेत.

सध्या संपूर्ण रायगडचा शेतकरी डोळ्यात आशा आणि मनात चिंता घेऊन आकाशाकडे बघतोय. निसर्गाने हिरावून नेले पुन्हा परत मिळवून देण्यासाठी आता शासनाच्या मदतीकडेच सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना; अशासकीय सदस्यांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीला गती देण्यासाठी, तसेच त्यांच्या विविध समस्या तातडीने प्रशासकीय पातळीवर सोडवण्यासाठी 'जिल्हा अल्पसंख्याक कल्याण समितीची' पुनर्रचना करण्यात येत आहे. या नवनिर्मित समितीवर काम करण्यासाठी जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजासाठी कार्यरत असलेल्या अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र आणि इच्छुक प्रतिनिधींनी आपले प्रस्ताव आगामी २७ जुलै २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करावेत, असे आवाहन अधिकृत प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे. अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी ग्राउंड लेव्हलवर काम करणाऱ्या संस्थांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना या समितीच्या माध्यमातून थेट शासनासोबत जोडले जाण्याची आणि धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेण्याची मोठी संधी मिळणार आहे. यासाठी इच्छुक स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी आपला संपूर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करणे अत्यंत आवश्यक आहे. सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये संस्थेचे अधिकृत नाव, कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, संस्थेचा नोंदणी क्रमांक आणि संस्थेचे अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासोबतच, संबंधित प्रतिनिधीने अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी भूतकाळात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा सविस्तर तपशील आणि अहवाल अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. पूर्ण माहिती आणि आवश्यक कागदपत्रांसह तयार केलेले हे प्रस्ताव २७ जुलै २०२६ या अंतिम मुदतीपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यालयीन वेळेत सादर करणे गरजेचे आहे. अंतिम मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. दरम्यान, या निवडीबाबत किंवा अर्जाच्या विहित नमुन्याबाबत अधिक माहिती हवी असल्यास इच्छुकांनी जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय येथे संपर्क साधून सविस्तर माहिती घ्यावी, असे प्रशासनाने पत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे 'महाराष्ट्राचा प्रादेशिक भूगोल' पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

सोयगाव, दि.१४ जुलै : संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील प्राध्यापक डॉ. पंकज शिंदे लिखित 'महाराष्ट्राचा प्रादेशिक भूगोल' या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार दि.१४ जुलै २०२६ अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाश काळे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. हे डॉ.शिंदे यांचे सातवे पुस्तक असून शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण भर ठरणार आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,प्रो.डॉ.शिवाजी अंभोरे,डॉ.सी.यू.भोरे, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉ.पंकज शिंदे यांचे अभिनंदन करत त्यांच्या सातत्यपूर्ण लेखनकार्याचे कौतुक केले.विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त, अभ्यासक्रमाभिमुख व संदर्भग्रंथ म्हणून हे पुस्तक निश्चितच मार्गदर्शक ठरेल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ.शिंदे यांना पुढील लेखन व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.पुस्तक प्रकाशनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेलान आहे.

## अर्थपूर्ती पतसंस्थेचा 10 व्या सर्वसाधारण सभेत 11 टक्के लाभांश जाहीर

### 10 वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



**जिंतूर, प्रतिनिधी :** जिंतूर येथील अर्थपूर्ती पतसंस्थेची १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री नगरेश्वर मंदिर येथे सभासदांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत आणि उत्साही वातावरणात पार पडली. संस्थेच्या गेल्या वर्षभरातील आर्थिक प्रगती, कामकाजाचा आढावा आणि भविष्यातील वाटचालीबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेत सभासदांच्या भागभांडवलावर ११ टक्के लाभांश (डिव्हिडंड) जाहीर करण्यात आला.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रत्नदीप कळमकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुंदरलाल सावजी बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर उपस्थित होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष किशोर देशपांडे, संचालक मनोज सारडा, ॲड. दर्शन कळमकर, ॲड. वाट्टमवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुकुंद सावजी कळमकर यांनी अर्थपूर्ती पतसंस्थेच्या आर्थिक शिस्तीचे, पारदर्शक कारभाराचे आणि सातत्यपूर्ण प्रगतीचे विशेष कौतुक केले. सभासद कार्यपद्धतीमुळे संस्थेने सहकार क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली असून इतर संस्थांसाठीही ती आदर्श ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेदरम्यान अनेक सभासदांनी संस्थेबद्दलचा विश्वास व्यक्त केला. "वेळेवर मिळालेल्या कर्जामुळे स्वतःचा व्यवसाय उभारता आला आणि आज कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले," असा अनुभव काही कर्जदारांनी सांगितला. सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे सक्षम नेतृत्व आणि कर्मचाऱ्यांची समर्पित सेवा यांच्या बळावर अर्थपूर्ती पतसंस्था भविष्यातही प्रगतीची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सभा यशस्वी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक चिद्रवार, मनोज चकोते, कपिल अभुरे, अमोल साळवे, रोकडे, अशोक बंड, ऐश्वर्या कांबळे, साक्षी वाट्टमवार यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आयुष्यभर आर्थिक स्वातंत्र्याकडे वाढता कल

छत्रपती संभाजीनगर - भारताच्या लोकसंख्येत वेगाने बदल होत आहेत. आज भारत तरुण देश म्हणून ओळखले जात असला, तरी देशात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वेगाने वाढत आहे. राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाच्या अंदाजानुसार, 2036 पर्यंत भारतातील प्रत्येक सातपैकी एक व्यक्ती ज्येष्ठ नागरिक असेल आणि त्यांची संख्या वाढून सुमारे 23 कोटींवर पोहोचण्याची शक्यता आहे.ही गरज लक्षात घेऊन आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रु गोल्ड पेन्शन सेव्हिंग्ज ही बोनस-लिंक्ड पेन्शन योजना सुरू केली आहे. ही योजना सुरक्षितता आणि लवचिकता लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे. या योजनेद्वारे ग्राहक निवृत्तीसाठी चांगला पेन्शन निधी तयार करू शकतात. यामध्ये गुंतवलेली रक्कम सुरक्षित राहते. तसेच आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगी किंवा आजारपणाच्या वेळी अंशतः रक्कम काढण्याची सुविधाही मिळते. त्यामुळे कुटुंबाचे आर्थिक भविष्य अधिक सुरक्षित राहण्यास मदत होते.

## जिल्ह्यात 'महाराजस्व अभियानाचा' श्रीगणेशा वृक्षलागवडीने होणार; जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : शासकीय योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचवणाऱ्या 'महाराजस्व अभियानाची' सुरुवात यंदा पर्यावरण रक्षणाचा संदेश देत वृक्षारोपणाने केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्वच शासकीय यंत्रणांनी वृक्ष लागवडीचे दिलेले उद्दिष्ट गांभीर्याने पूर्ण करावे. केवळ झाडे लावून न थांबता लोकसहभागातून त्यांचे जतन आणि संवर्धन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील विविध विभागांच्या वृक्षलागवड तयारीचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीला माजी आमदार संजय केणेकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनू पी.एम, प्रादेशिक वन अधिकारी सुवर्णा माने, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी संदीप गिरी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी यांच्यासह सर्व महत्त्वाच्या विभागांचे प्रमुख उपस्थित होते. यंदाच्या २२ जुलै पासून जिल्ह्यात 'महाराजस्व अभियान' राबवले जाणार आहे. या अभियानांतर्गत नागरिकांना विविध दाखले, सेवा आणि शासकीय योजनांचे लाभ दिले जातील. मात्र, या लोककल्याणकारी मोहिमेची नांदीच मुळात वृक्षारोपणाने व्हावी, अशी जिल्हाधिकाऱ्यांची संकल्पना आहे. त्यानुसार, प्रत्येक विधानसभा मतदारसंघ निहाय स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपणाचे भव्य कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

झाडे लावण्यासाठी शासकीय विभागांना ऐनवेळी रोपांची कमतरता भासू नये, म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी सामाजिक वनीकरण विभागाला विशेष सूचना केल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व शासकीय रोपवाटिकांची (नर्सरी) अद्ययावत माहिती तयार करणे. कोणत्या रोपवाटिकेत कोणती आणि किती रोपे उपलब्ध आहेत, याची यादी देणे.

संबंधित रोपवाटिकांच्या प्रमुखांचे नाव आणि संपर्क क्रमांक सर्व विभागांना तात्काळ पुरवणे. "हरित महाराष्ट्र मोहीम केवळ कागदावर किंवा सरकारी फाईलींपुरती मर्यादित राहू नये. ती सर्वसामान्य नागरिकांची चळवळ व्हावी यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्था (NGOs) आणि सामाजिक कार्यकर्त्यांना यात मोठ्या प्रमाणावर जोडून घ्यावे." संजय केणेकर (माजी आमदार) यांनी सुचवले

## घरकुलच्या पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीयीकृत बँकांनी गृहकर्ज उपलब्ध करून देण्याचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे आदेश




छत्रपती संभाजीनगर - प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घरकुलच्या पात्र लाभार्थ्यांना, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि स्वतःच्या घराच्या प्रतीक्षेत असलेल्या गरजू लाभार्थ्यांना राष्ट्रीयीकृत बँकांकडून सुलभ, परवडणारे व वेळेत गृहकर्ज उपलब्ध करून देण्यात यावे, या मागणीसाठी युवा शक्ती पत्रकार संघाच्या वतीने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांना जनहिताचे निवेदन देण्यात आले. निवेदनाची गांभीर्याने दखल घेत विभागीय आयुक्तांनी अग्रणी बँक अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना गृहकर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांना निवेदन देताना युवा शक्ती पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष अब्दुल कय्यूम, अलीम बेग, रियाज अन्सारी, आरेफ देशमुख, अथर चिश्ती, एजाज बेग आणि वसीम खान आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घरकुलांचे काम समाधानकारक पद्धतीने सुरू असून अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होत आहे. मात्र, अनेक लाभार्थ्यांना पहिला हप्ता भरल्यानंतर उर्वरित रक्कम भरण्यासाठी आवश्यक असलेले गृहकर्ज राष्ट्रीयीकृत बँकांकडून सहज उपलब्ध होत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी अनेकांना खासगी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून अधिक व्याजदराने गृहकर्ज घ्यावे लागत असून त्याचा अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

युवा शक्ती पत्रकार संघाने विभागीय आयुक्तांकडे प्रधानमंत्री आवास योजना लाभार्थ्यांच्या गृहकर्ज अर्जांना प्राधान्याने मंजुरी देण्यात यावी, कर्ज मंजुरीची प्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान करण्यात यावी, सवलतीच्या व्याजदरात गृहकर्ज उपलब्ध करून द्यावे, प्रक्रिया शुल्कात सवलत द्यावी तसेच राष्ट्रीयीकृत बँका व संबंधित वित्तीय संस्थांमध्ये प्रभावी समन्वय साधून लाभार्थ्यांना दिलासा देण्यात यावा, अशी मागणी केली.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी निवेदनाची गांभीर्याने दखल घेत संबंधित बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी (CEO) दूरध्वनीवरून संपर्क साधला. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना गृहकर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक सहकार्य करावे आणि आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच या विषयात प्रशासनामार्फत आवश्यक समन्वय साधला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

## हरित भविष्यासाठी श्री. कॉम्प्युटरचा पुढाकार; नेमगिरी संस्थानात वृक्षारोपण



**जिंतूर | तालुका प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत श्री. कॉम्प्युटर, जिंतूर यांच्या वतीने श्री नेमगिरी संस्थान येथे वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री नेमगिरी संस्थानचे अध्यक्ष श्री. विरेंद्रकुमार सावजी कळमकर होते.

यावेळी पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी, अमित शिराळकर, श्री. कॉम्प्युटरचे संचालक संतोष चौधरी,डॉक्टर असोसिएशन तालुकाध्यक्ष डॉ. शिवप्रसाद सानप, पत्रकार सचिन रायपत्रीवार, महेश देशमुख व शंतनु कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विविध प्रजातींच्या वड, पिंपळ, गुलमोहर, बेल, निलगिरी, जाबूल, आदी आयुर्वेदिक वृक्षांचे रोपण करण्यात आले.

यावेळी संतोष चौधरी यांनी १०० हून अधिक वृक्षांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प जाहीर केला. वाढते प्रदूषण, घटते हरित क्षेत्र आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. तसेच महाराष्ट्र AI रेडी या मोफत कोर्स चे सर्टिफिकेट मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करिता संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी सौ. नवले मॅडम, कळूजी राऊत, विद्यार्थी, वाघ, पर्यावरणप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मातोश्री अनाथ आश्रमातील आई बाबाचे सानिध्यात; ज्ञानेश्वर बोरसे यांचा उपक्रम



सिल्लोड (प्रतिनिधी) : वाढदिवसाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर पैठण रोडवरील मातोश्री अनाथ आश्रम येथील आई बाबांची भेट घेत, या आई बाबांच्या जीवनामध्ये आपलेसे कोणीतरी आहे याची जाणीव व्हावी म्हणून विधायक वृत्तपत्राचे संपादक ज्ञानेश्वर दगडू बोरसे यांनी आपला वाढदिवसाचा संपूर्ण प्रसंग त्यांच्या सोबत घालत आपापलेपणाचे आणि जिव्हाळ्याचे एक आनोखे असे नाते जपण्याचा प्रयत्न दि.१३-७ रोजी करण्यात आला.

वाढदिवस साजरा करण्याऐवजी वाढदिवस साजरा करताना होणारा नाहक खर्च हा मातोश्री वृद्धाश्रमातील आई-बाबांसाठी कसा खर्च होईल याचा विचार करून या आई-बाबांसाठी केळी पपई सारखे फळ खर्च करून ते या आई-बाबांना वाटप करण्यात आले. मातोश्री वृद्धाश्रमात आई-बाबांची भेट घेऊन फळ वाटप करत असताना ज्ञानेश्वर बोरसे यांचे कुटुंब व त्याचप्रमाणे दैनिक तरुण भारत सिल्लोड तालुक्याची प्रतिनिधी गजानन मरकड हे उपस्थित होते.

मातोश्री वृद्धाश्रमातील आई-बाबांची चर्चा करत असताना काही आई-बाबांनी आपल्या जीवनातील सुखदुःखातील प्रसंग सांगितले व भेट घेतलेल्या बोरसे कुटुंबियांना दीर्घायुष्य लाभो असे उद्गार काढत आम्हाला पुन्हा भेटण्यासाठी या असे शेवटी सांगितले.

## सहायक पोलीस निरीक्षक विश्वजीत कासले यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे

### सहाव्या दिवशी तीन महिलांचेउपोषण स्थगिती



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** परभणीच्या उपोषण मैदानावर गेले सहा दिवसापासून तीन महिलांचे अमरण उपोषण चालू होते सोमवार दिनांक 13 जुलै रोजी सहाव्या दिवशी नवा मोंढा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक साहेब यांच्या मध्यस्थीमुळे या तीन महिलांनी आमरण उपोषण मागे घेतले असून महिला व बाल एकात्मिक विरोधात उपोषण होते महिला व जिल्हा बाल विकास विभागाचे मिलिंद वाघमारे यांच्या आश्वासनानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले उपोषणाचा संदर्भाअसाकी शहरातील अंगणवाड्यांना आहार पुरवठा करण्यासाठी ई टेंडर प्रक्रिया राबविण्यासाठी या मागणीसाठी महिला बचत गट महिला मंडळ व स्वयंसेवी संस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते सहाव्या दिवशी मोंढा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत कासले साहेब यांनी त्या महिलांची जाऊन चर्चा केली त्यांच्या मागण्या संदर्भात संपूर्ण माहिती घेतली महिला व जिल्हा बाल विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी मिलिंद वाघमारे यांच्याशी चर्चा करून त्या महिलांना विचार करून न्याय देण्यात येईल असे सांगून कासले साहेबांच्या व वाघमारे साहेब यांच्या हे उपोषण मागे घेण्यात आले या उपोषणात उपोषणकर्त्या कल्पना दळवी शेख मुमताज मीना चव्हाण . यांनी आपले उपोषण माघार घेतल्याचे जाहीर केले.

## अल्पसंख्याक मुलींच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी 25 जुलैपर्यंत अर्ज आमंत्रित

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** पाथरी येथील अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी सन २०१६ पासून शासकीय वसतिगृह सुरू असून, पात्र विद्यार्थिनींनी 25 जुलैपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सदर वसतिगृहात १०० मुलींच्या निवासाची व्यवस्था असून, त्यापैकी ७० जागा अल्पसंख्याक समाजातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, शीख व पारशी मुलींसाठी आरक्षित आहेत. उर्वरित ३० जागा शासनाच्या प्रचलित आरक्षण धोरणानुसार बिगर अल्पसंख्याक मुलींकडून भरण्यात येणार आहेत.

खुल्या व इतर प्रवर्गातील मुलींसाठी प्रति सत्र २,८५० रुपये निवासी शुल्क आकारण्यात येणार आहे. वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या मुलींना नाश्ता व भोजनाचा खर्च स्वतः करावा लागणार आहे. तसेच शासन निर्णयानुसार आहार भत्ता योजनेअंतर्गत अल्पसंख्याक समाजातील पात्र मुलींना दरमहा ३,००० रुपये आहार भत्ता त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. वसतिगृह प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी अधीक्षक, अल्पसंख्याक मुलींचे शासकीय वसतिगृह, पाथरी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पाथरी तथा सदस्य-सचिव, अल्पसंख्याक मुलींचे शासकीय वसतिगृह, पाथरी यांनी केले आहे.

## विशेष सखोल पुनर्निरीक्षण कामात 100 टक्के यश; कर्तव्यदक्ष बूथ लेव्हल अधिकाऱ्यांची जिल्हा प्रशासनाकडून कौतुक

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** - विशेष सखोल पुनर्निरीक्षण (SIR) मोहिमेत जिंतूर, पाथरी आणि गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील काही बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांनी अत्यंत नियोजनबद्ध, जबाबदारीने आणि वेळेचे काटेकोर पालन करत आपले काम १०० टक्के पूर्ण केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत जिल्हा प्रशासनाने त्यांचे विशेष कौतुक केले आहे.

जिंतूर विधानसभा मतदारसंघातील दिनकर घुगे, पाथरी विधानसभा मतदारसंघातील श्रीकांत अरुणराव नांदगावकर, संतोष रामराव चाफळे, अमोल जगताप, बी. जी. वाघ, तसेच गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील बापूरराव वैजनाथ लांडगे यांनी SIR मोहिमेतील सर्व कामे शंभर टक्के पूर्ण करून आदर्श निर्माण केला आहे.

या अधिकाऱ्यांनी केलेले नियोजन, नागरिकांशी प्रभावी समन्वय आणि वेळेत काम पूर्ण करण्याची कार्यपद्धती ही इतर BLOसाठी प्रेरणादायी ठरत आहे. जिल्हा प्रशासनाने त्यांच्या कार्याचे अभिनंदन करत उर्वरित सर्व BLOनीही याच जिद्दीने व तत्परतेने काम पूर्ण करून मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेला यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

"कर्तव्यनिष्ठा, वेळेचे नियोजन आणि लोकसेवेची भावना असेल, तर कोणतेही काम वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पूर्ण करता येते," असा सकारात्मक संदेश या BLOच्या कामगिरीतून मिळत असल्याची भावना प्रशासनाने व्यक्त केली.

प्रशासनाने केले कौतुक

BLO यांनी केलेल्या कार्याची दखल घेत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, निवडणूक उपजिल्हाधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी जिंतूर शैलेश लाहोटी, पाथरी संगीता चव्हाण, गंगाखेड जीवराज डापकर यांच्यासह सर्व अधिकारी, सर्व तहसीलदार आदींनी या BLO यांचे कौतुक केले. इतरांनाही या कामातून प्रेरणा मिळेल असे मत व्यक्त केले.

## छत्रपती शिवाजी विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणुकीचे आयोजन

**सिल्लोड :** येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणूकचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश निवडणुकीचे स्वरूप विद्यार्थ्यांना कळावे तसेच लोकशाही मूल्याची रुजवण, शिस्त, जबाबदारी, नेतृत्व गुणाचा विकास ,भविष्यातील कार्याचे नियोजन विद्यार्थ्यामधे रुजावे व विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, लोकशाहीची प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया अनुभवता यावी, असा होता.

या उपक्रमाच्या अनुषंगाने शाळेचे मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना निवडणुकीच्या संदर्भामध्ये मौलाचे मार्गदर्शन केले, तर निवडणूक पार पाडण्यासाठी विद्यालयातील शिक्षक रमेश सोनवणे, संगीता तायडे, डॉ रमेश काळे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांची भूमिका पार पडली.

शाळेतील विद्यार्थी संसदेमध्ये वर्गप्रतिनिधींमधून निवडणूक पद्धतीने विद्यार्थ्यांची निवड केली. या संसदेत मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, क्रीडा मंत्री, शिस्त मंत्री आणि सांस्कृतिक मंत्री यांसारखी विविध पदे विद्यार्थ्यांकडे सोपवण्यात आली.




विद्यार्थ्यांना भारतीय निवडणूक प्रक्रियेची माहिती होण्यासाठी विद्यार्थी संसद निवडणुकीचे निश्चित वेळापत्रक तयार करण्यात आले होते. त्या वेळापत्रकानुसार आचारसंहिता, अर्ज भरणे प्रक्रिया, अर्ज पडताळणी, उमेदवारांना चिन्ह वाटप, प्रचार, त्यानंतर प्रत्यक्ष मतदान व निकाल या सर्व निवडणुकीच्या पायऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतः अनुभवल्या त्यामुळे निवडणूक प्रक्रिया, उमेदवारी, मतदान आणि प्रतिनिधी निवड या तांत्रिक बाबींचे व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त झाले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निवडणुकीबद्दल असणाऱ्या अनेक बाबी शालेय जीवनात लक्षात आल्या, लोकशाही मतदान पद्धत कशी असते, लोकशाही मूल्याची रुजवण, शिस्त व जबाबदारी, नेतृत्व गुणाचा विकास, भविष्यातील कार्याचे नियोजन विद्यार्थ्यांना कळाले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक निशांत मस्के उपक्रमाचे कौतुक करताना म्हणाले की, शाळेमध्ये विद्यार्थी संसद आयोजित करणे हा विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचा आणि त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, भिकन आगारे, सुनील तांबे, कडूबा गीते, रमेश परदेशी, अंगद काळे, गणेश चव्हाण, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, अमोल ताटू, गजानन दौड, पंकज सावंत, संगीता काळे, नम्रता वडमारे, हर्षदा सानान्से, रमेश सपकाळ, शैलेश मोरे यांनी परिश्रम घेतले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# कोल्हापूरच्या धर्तीवर छत्रपती संभाजीनगरमध्ये पीआर कार्ड; मनपा सर्वसाधारण सभेत 6 कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहराच्या वाढीव क्षेत्रात म्हणजेच १८ खेड्यांमध्ये पीआर कार्ड देताना बहुतांश मालमत्ता या गुंठेवारीत मोडतात. या सर्व मालमत्ताधारकांना आता पीआर कार्ड मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या कामाला मंगळवारी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. शहरातील २ लाख ८६ हजार ५०० मालमत्ताधारकांचा सातबारा रद्द करून त्यांना पीआर देण्याची योजना शासनाने अंमलात आणली असून भूमी अभिलेख विभागामार्फत हे काम केले जाणार आहे.मंगळवारी (१४ जुलै) सर्वसाधारण सभेमध्ये हा विषय मांडण्यात आला. यावर सविस्तर चर्चा होऊन या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान, या सर्व प्रक्रियेसाठी तब्बल ६ कोटी रुपये खर्च येणार असून, हा निधी डीपीडीसीतून (DPDC) मिळावा यासाठी प्रस्ताव सुद्धा पाठविला जाणार आहे. आचारसंहिता संपल्यानंतर प्रथमच मंगळवारी महापालिकेची सर्वसाधारण सभा पार पडली. यात मनपा प्रशासनातर्फे पीआर कार्डचा ठराव सर्वसाधारण सभेसमोर ठेवला होता. यावर सदस्यांनी आपापले मत व्यक्त करत चर्चेत सहभाग घेतला. प्रारंभी नगरसेवक राजगौरव वानखेडे यांनी, शहराच्या इतिहासात पहिल्यांदा हे मोठे काम होत असल्याचे सांगितले. महापौर समीर राजूरकर यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले, त्याबद्दल वानखेडे यांनी महापौरांचे अभिनंदन केले. १८ खेड्यांमध्ये बहुतांश मालमत्ता या गुंठेवारीत मोडतात. त्यांना अगोदर सातबारामध्ये नाव घ्यावे लागेल, त्यावरून पीआर कार्ड तयार करून मिळेल. या चर्चेदरम्यान नगरसेवक राजगौरव वानखेडे यांनी भूमी अभिलेख विभागाच्या इतिहासाचा दाखला दिला. भूमी अभिलेख विभागाने सलीम अली सरोवराचे चार पीआर कार्ड तयार करून दिले आहेत, असा कोणताही प्रकार या भागात होऊ नये, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. तसेच सिडको-हडकोसाठीही विशेष बाब म्हणून पीआर कार्ड द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. यानंतर महापौरांनी हस्ताक्षेप करत या ठरावावर अधिक प्रकाश टाकला. त्यांनी नमूद केले की, वाढीव हद्दीतील १८ खेड्यांमधील नागरिकांना पीआर कार्ड मिळतील. शहरात अगोदरच सीटीएस क्रमांक आहेत. चर्चेत भाग घेताना अमित भुईगळ यांनी स्लम मधील नागरिकांचा विचार करावा लागणार असल्याचे म्हटले. तर वक्फ बोर्डाच्या जागांचे काय? असा प्रश्न उसामा अब्दुल कदीर यांनी उपस्थित केला. नगरसेवक रशीद मामू, सविता कुलकर्णी, माधूरी अदवंत यांनीही या विषयावर आपली भूमिका मांडली. नागरिकांना मोठा दिलासा देताना त्यात चुकीचे काही होणार नाही, याची काळजी व दक्षता घ्यावी अशी सूचना सर्व नगरसेवकांनी केली. यावर उपसंचालक मनोज गर्जे यांनी सविस्तर माहिती देताना, या योजनेचा २ लाख ८६ हजार ५०० जणांना लाभ होणार असल्याचे सांगितले. शासनाने या संदर्भात अध्यादेश काढून निर्णय घेतला असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### चौकशीनंतरच मिळणार पीआर कार्ड: आयुक्त अमोल येडगे

**पालिका आयुक्त अमोल येडगे यांनी याविषयी अधिक माहिती देताना नमूद केले की, कोल्हापूर येथे हे काम झाले आहे. त्याच धर्तीवर शासनाने छत्रपती संभाजीनगर शहराची निवड करून पीआर कार्ड देण्याचा निर्णय घेतला आहे. सभेत अशा पद्धतीचा ठराव घेणारी ही पहिली महापालिका आहे. गावठाण आणि अन्य ठिकाणी पूर्ण चौकशी करूनच पीआर कार्ड दिले जाणार असल्याचे आयुक्त येडगे म्हणाले. यानंतर महापौर समीर राजूरकर यांनी ठरावाला अंतिम मंजुरी दिली.**

# मंत्री अतुल सावेंच्या हस्ते रामराज्य ग्रुप च्या वृक्षारोपण उपक्रमांचे उदघाटन

## राज्यभरात दहा हजार वृक्ष लागवडीचे नियोजन



**छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर | येथे दि. १२ :** रोजी रामराज्य ग्रुप तर्फे महाराष्ट्रभर दहा हजार वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले असून या वृक्षारोपण उपक्रमाचे उदघाटन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल मोरेश्वर सावे यांच्या हस्ते उपक्रमाचे पहिले झाड लावून रविवारी (दि. १२) करण्यात आले. यावेळी रामाराज्य ग्रुप संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामाभाऊ मुळे, आयोजक सचिन राठोड, राजु राठोड, माऊली तोडमल, आदिनाथ मुळे, रणजीत राठोड, शुभम डमाळे पाटील, शुभम नेव्हळ, अमोल धनवटे,साहिल राठोड,अनिल औताडे, अविनाश दौंड, अभि राजपूत, विठ्ठल उबाळे, विशाल दांडगे, मयूर वैष्णव, ऋषी जाधव, शैलेश चव्हाण, सौरभ भोजने, विशाल सरोदे, अशोक औताडे व रामराज्य ग्रुपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. रामराज्य ग्रुप च्या या स्तुत्य उपक्रमांचे अभिनंदन करत पर्यावरण सवर्धनासाठी प्रत्येकाने एकतरी लावावे असे आवाहन यावेळी मंत्री अतुल सावे यांनी केले.

# योजनाबाह्य कामांच्या सक्तीविरोधात अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा धडक मोर्चा

## 'बीएलओ'सह निवडणुकीची कामे रद्द करण्याची मागणी



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्र सरकारच्या स्पष्ट निर्देशांनंतरही अंगणवाडी सेविका व मदतनीसांकडून बीएलओ, मतदार यादी पुनरावलोकन तसेच इतर योजनाबाह्य कामे सक्तीने करून घेतली जात असल्याच्या निषेधार्थ आयटक प्रणीत अंगणवाडी कर्मचारी युनियनच्या वतीने मंगळवारी जिल्हा परिषदेवर धडक मोर्चा काढण्यात आला. जिल्हा परिषदेसमोर शेकडो कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलन केल्याने परिसरातील वाहतूक सुमारे दीड तास विस्कळीत झाली.

मोर्चेकऱ्यांनी निवडणुकीची कामे तातडीने थांबविण्याबरोबरच प्रलंबित आर्थिक मागण्या निकाली काढण्याची मागणी केली. महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मंगल पांचाळ यांनी आंदोलनस्थळी येऊन निवेदन स्वीकारले. अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडून निवडणुकीची कामे करून घेऊ नयेत, यासाठी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात येईल, तसेच जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यानंतर मोर्चाने जुबिली पार्क येथील महिला व बालविकास विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त कृष्ण राठोड यांच्या कार्यालयावर धडक देत जोरदार निदर्शने केली. शहरी भागातील कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, तसेच निवडणुकीच्या कामांबाबत शासनाच्या निर्देशांची अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

आयटकने केंद्र सरकारच्या २८ ऑक्टोबर २०२५ च्या पत्राचा दाखला देत अंगणवाडी सेविका व मदतनीसांवर योजनाबाह्य कामांचा अतिरिक्त बोजा टाकणे हे शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन असल्याचे स्पष्ट केले. अशा कामांमुळे अंगणवाडीतील बालक, गर्भवती आणि स्तनदा मातांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचा मुद्दाही यावेळी मांडण्यात आला.

यावेळी बीएलओ व इतर निवडणूक कामांतून अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मुक्तता, थकीत आहार व प्रवास देयके अदा करणे, अतिरिक्त कार्यभार भत्ता, मोबाईल रिचार्ज खर्च, निवृत्ती लाभ, रिक्त पदांमध्ये पात्र अंगणवाडी कर्मचाऱ्यांना प्राधान्य आणि इतर प्रलंबित मागण्या तातडीने मंजूर करण्याची मागणी करण्यात आली.

कॉ. प्रा. राम बाहेती, कॉ. तारा बनसोडे, कॉ. शीला साठे, कॉ. विलास शेंगुळे, कॉ. अनिता पावडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मोर्चात पैठण, गंगापूर, वैजापूर, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, सोयगाव, सिल्लोड आदी तालुक्यांतील सुमारे एक हजार अंगणवाडी सेविका व मदतनीस सहभागी झाल्या.

# कर्मचाऱ्यांना 24 तासात मूळ ठिकाणी र हजर राहण्याचे आदेश,: सीईओ नताशा माथुर

## जिल्हा परिषदेतील सर्व तात्पुरत्या व्यवस्था व पर्यायी पदस्थापन रद्द.

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** येथील जिल्हा परिषदेतील काही वर्षानुवर्ष सोयींच्या ठिकाणी प्रतिनियुक्ती पर्यायी व्यवस्था आणि अतिरिक्त पदभाराच्या माध्यमातून एकाच ठिकाणी ठाण म्हणून बसलेल्या जि प कर्मचाऱ्यांना सीईओ नतिशा माथूर यांनी चांगलाच चाप बसवला आहे तात्पुरत्या स्वरूपात व्यवस्था रद्द करून त्यामुळे प्रतिनियुक्तीच्या आधारावर सोयीच्या ठिकाणी सेवा बजावत काम चुकार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दणका बसणार आहे गेल्या अनेक वर्षापासून जि प च्या विविध विभागामध्ये तात्पुरत्या व्यवस्था व पर्यायी पदस्थापना अतिरिक्त पदभार तसेच आठवड्यातील दोन दिवस जिल्हा परिषद मुख्यालयात आणि तीन दिवस मूळ पद स्थापनेच्या ठिकाणी काम करण्याच्या पद्धतीमुळे अनेक कर्मचाऱ्यांनी मनमानी करून आपापल्या सोयीची व्यवस्था करून घेतली होती या परिणामी दुर्गम व ग्रामीण भागातील कार्यालयामध्ये कर्मचारी टंचाई निर्माण झाली होती अनेक कामासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना चकरा माराव्या लागत होत्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीषा माथुर यांनी 13 जुलै रोजी निर्गमित केलेले आदेशाद्वारे जिल्हा परिषद व तालुका स्तरावरील सर्व तात्पुरत्या व्यवस्था पर्यायी व्यवस्था अतिरिक्त पदभार तसेच विशेष कामकाजासाठी काढण्यात आलेल्या सर्व आदेश तात्काळ प्रभावाने रद्द केले आहेत.

त्यामुळे सर्व अधिकारी

# 'फिजिऑलॉजी रियुनियन 2026'ला देश-विदेशातील माजी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

## वेरुळ येथे 'रुट्स अँड हॉरायझन्स' उपक्रम; निवृत्त प्राध्यापकांचा गौरव, नव्या पिढीला अनुभवाची जोड

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (घाटी) शरीरक्रियाशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या 'फिजिऑलॉजी रियुनियन २०२६ – रुट्स अँड हॉरायझन्स' या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला देश-विदेशातील माजी विद्यार्थी आणि निवृत्त प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वेरूळ येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात सुमारे ६० आजी-माजी विद्यार्थी, प्राध्यापक आणि तज्ज्ञांनी सहभाग नोंदवत जुन्या आठवणींना उजाळा दिला, तसेच वैद्यकीय शिक्षणातील अनुभवांची देवाणघेवाण केली.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते निवृत्त प्राध्यापकांसह उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अध्यापकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी, "या विभागातील अनेक शिक्षक माझे गुरुवर्य असून माझ्या जडणघडणीत त्यांचे मोठे योगदान आहे. शिक्षकांचा सन्मान करणारा असा उपक्रम इतर विभागांनीही राबवावा," असे मत व्यक्त केले.

विभागप्रमुख डॉ. अंजली शेटे यांनी 'रुट्स अँड हॉरायझन्स' या संकल्पनेमागील उद्देश स्पष्ट करताना, अनुभवी आणि नव्या पिढीतील प्राध्यापकांमध्ये ज्ञान, अनुभव आणि मूल्यांचा सेतू निर्माण करण्यासाठी हा उपक्रम आयोजित केल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. रोहिणी पिसोळकर, डॉ. उर्जिता झिंगाडे, डॉ. शरदचंद्र वानखेडे, डॉ. मंगल कुलकर्णी, डॉ. सुरेखा कौडिन्य, डॉ. गोपाळ नगाटे, डॉ. मिनाज पठाण, डॉ. दत्तात्रय थोरात, डॉ. कुंदा लाखकर, डॉ. सुधीर चौधरी आणि डॉ. काशिनाथ गर्कळ यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. नंदा सोमवंशी, डॉ. काशिनाथ गर्कळ, डॉ. सुरेखा जाधव, डॉ. चंद्रशेखर डांगे, डॉ. अश्फाक सय्यद, डॉ. स्मिता बुट्टे, डॉ. रुपा डोईफोडे तसेच शरीरक्रियाशास्त्र विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# फुटबॉल वेड्या सायकलिस्टचे विठुरायांना साकडे



हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सायकल वेड्या कोल्हापुरात फुटबॉलच्या 185 किमी भ्रमन करत विठुरायांना अनोख्या पद्धतीने साकडे घातले. कोल्हापूर हे फुटबॉलची पंढरी म्हणून जगविख्यात आहे सध्या फिफा विश्वचषक चालू आहे परंतु या विश्वचषकामध्ये भारतीय संघाचा समावेश नाही.याची खंत व्यक्त सायकल वेड्या समुहाने कोल्हापूर ते पंढरपूर अशी तब्बल 185 किलोमीटर सायकल वारी करत पंढरपूर येथे जाऊन विठुरायांना साकडे घातले व भारतीय भारतीय संघ विश्वचषकामध्ये समाविष्ट व्हावा यासाठी प्रार्थना केली या सायकल वारीत सायकल वेडे संघटनेचे अध्यक्ष राम मोहन कारंडे आंतरराष्ट्रीय खेळाडू अभय मोरे,पांडुरंग माळी, जयदीप पाटील, नितीन थोरात,दिनकर पवार, मारुती पाटील,सुभाष गोरगोंद, हर्जित सिंग, बाजीराव भोसले, अनिल खटावकर यांचा समावेश होता.

# संत बाळूमामा देवस्थान येथे खा. रामराव वडकुते यांच्याहस्ते महाआरती

## ₹1,00,101 ची देणगी, सभामंडप उभारणीचे शंभर टक्के आश्वासन

हिंदू प्रकाशवार्ता /गोपाल सातपुते

**हिंगोली :** अमावस्येनिमित्त संत बाळूमामा देवस्थान शेंबाळपिंपरी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य धार्मिक सोहळ्यात हिंगोली जिल्ह्याचे राज्यसभा खासदार डॉ रामरावजी वडकुते यांनी उपस्थित राहून श्री बाळूमामांच्या महाआरतीचा लाभ घेतला. हजारो भाविक, माता-भगिनी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात हा सोहळा पार पडला.



तिरुपती येथून रात्री सुमारे आठ वाजता हिंगोली येथे पोहोचल्यानंतर शेंबाळपिंपरी येथे अमावस्या निमित्त आयोजित महाआरतीस उपस्थित राहण्याचा भक्तांचा आग्रह होता. तो बाळूमामांचा आदेश समजून आपण या कार्यक्रमास उपस्थित राहिलो, असे खासदार वडकुते यांनी सांगितले. यावेळी त्यांचा भाविकांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

रात्री बारा वाजता खासदार रामरावजी वडकुते यांच्या शुभहस्ते श्री बाळूमामांची महाआरती संपन्न झाली. यावेळी त्यांनी देवस्थानासाठी रोख ₹१ लाख १०१ (एक लाख एकशे एक रुपये) देणगी जाहीर केली. तसेच देवस्थानाच्या सभामंडपाच्या उभारणीसाठी शंभर टक्के सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी उपस्थित भाविकांना संबोधित करताना खासदार रामरावजी वडकुते म्हणाले, "मी आज बाळूमामांच्या आशीर्वादाने राज्यसभा खासदार आहे. त्यांच्या कृपेनेच मला जनसेवेची संधी मिळाली. त्यांच्या चरणी सेवा करण्याचा आणि महाआरती करण्याचा लाभ मिळणे, हे माझ्या आयुष्यातील अत्यंत भाग्याचे क्षण आहेत."

या प्रसंगी उपस्थित भाविकांनी "बोला बोला बाळूमामांच्या नावाने चांगभलं... चांगभलं!" असा जयघोष करत संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. धार्मिक श्रद्धा, उत्साह आणि भक्तिभावाने भरलेल्या या सोहळ्याने शेंबाळपिंपरी परिसरात अविस्मरणीय वातावरण निर्माण झाले.

# सायकल वारी, विठ्ठलाच्या दारी : 'पर्यावरण वाचवा'चा संदेश देत 65 जणांचा 310 किलोमीटर भक्तिमय प्रवास

**छत्रपती संभाजीनगर, ता. १२ :** "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" नामाचा गजर करत आणि 'सायकल चालवा, पर्यावरण वाचवा', असा संदेश देत 'सायकललिस्ट फाउंडेशन'च्या ६५ सायकलवीरांनी पंढरपूरची वारी यशस्वीरीत्या पूर्ण केली. क्रू मेंबर्स आणि इतर सहकाऱ्यांसह एकूण ७१ जणांचा हा ताफा तब्बल ३१० किलोमीटरचा खडतर प्रवास करून शनिवारी (ता. ११) विठ्ठलाच्या दारी पोचला.

शुक्रवारी (ता. १०) पहाटे सहाला छत्रपती संभाजीनगर येथून 'सायकल वारी'ला उत्साहात सुरुवात झाली. ५० किलोमीटरचा टप्पा पार पडल्यानंतर पाचोड टोल नाक्याजवळ सर्वांनी नाश्ता केला. दुपारी एकला गेवराई येथे भोजन करून हा ताफा पुढे निघाला. मात्र, या प्रवासात निसर्गाने सायकलपटूंची कडक परीक्षा घेतली. सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत अंगाची लाहीलाही करणाऱ्या उन्हातही सायकलपटूंचा उत्साह कमी झाला नाही. दर दोन तासांनी थांबून सर्वांनी पाणी आणि ओआरएस घेत स्वतःला हायड्रेट ठेवले.

*मांजर सुंबा घाटात खरी परीक्षा*



प्रवासातील सर्वात कठीण टप्पा होता 'मांजर सुंबा घाट'. दोन्ही बाजूंनी डोंगर फोडून तयार केलेल्या या घाटात वारा वाहण्यास अजिबात वाव नव्हता. त्यामुळे तेथील कोंदट वातावरण आणि प्रचंड उष्णतेने सायकलपटूंचा कस लागला. एका बाजूने संथ गतीने चालणारे ट्रक आणि दुसऱ्या बाजूने मिळालेला छोटा रस्ता यामुळे हा रस्ता अत्यंत चिमट आणि त्रासदायक ठरला. या सर्व अडचणींवर मात करत अखेर रात्री आठला पेढ्याचे प्रसिद्ध गाव असलेल्या सरमकुंडी फाट्यावर हा ताफा पोचला. तेथेच रात्रीचा मुक्काम व भोजन झाले. वारीचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे अवघ्या ११ वर्षाची ग्रीष्मा बोडखे आणि वंशिका गायकवाड आणि १२ चा तनय व्यवहारे आणि अकूल जोशी.

या मुला-मुलींची जिद्द,प्रौढांच्या बरोबरीने ३१० किलोमीटरचे अंतर पार पाडून सर्वांनाच थक्क केले.

**भव्य सायकल संमेलन :** शनिवारी (ता. ११) सकाळी सहाला सरमकुंडी भूम, शेंद्री, कुर्डूवाडी मार्गे प्रवास करत हा ताफा संध्याकाळी पाचला पंढरपुरात दाखल झाला. पंढरपूर येथे संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत भव्य 'सायकल संमेलन' पार पडले. संमेलनात राज्यभरातील १४० हून अधिक क्लब्सच्या सुमारे ८००० सायकलपटूंनी भाग घेतला होता. यामध्ये गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, अमरावती, मुंबई या शहरांसह कर्नाटकातील विजापूर, निपाणी, बेळगाव येथील सायकल क्लबही सहभागी झाले होते.

**डोळ्यांचे पारणे फेडणारे रिंगण :**

रविवारी (ता. १२) पहाट पंढरपुरात एका वेगळ्याच उत्साहात उजाडली. सकाळी सहाला संपूर्ण पंढरपूरचे रस्ते बंद करून सायकलपटूंनी विठ्ठल मंदिराला 'नगर प्रदक्षिणा' घातली. त्यानंतर रेल्वे ग्राउंडवर सर्व सायकलपटूंनी एकत्र येत शिस्तबद्ध आणि डोळ्यांचे पारणे फेडणारे 'सायकल रिंगण' सादर केले.

**आम्हाला पायी वारीसाठी ८ ते १५ दिवसांची सुटी मिळणे शक्य नसते. म्हणूनच अवघ्या २-३ दिवसांत सायकलने विठ्ठलाच्या चरणी पोचून चौथ्या दिवशी संमेलन, रिंगण अनुभवून घरी परतता येणारी ही सायकल वारी दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे. आमच्या ग्रुपचे हे सलग पाचवे वर्ष असून यंदा संभाजीनगरमधून सर्वाधिक सायकलपटू सहभागी झाले होते.**
**- डॉ. विजय व्यवहारे, सायकलिस्ट फाउंडेशन**

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911